# अमेरिकन जनमानसाचा कानोसा

## चन्द्रशेखर पुरन्दरे

गेले काही महिने सगळ्या जगाचेच लक्ष अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे वेधले आहे. आठ वर्षांच्या आजवरच्या रिपब्लिकन पक्षाच्या कारकीर्दीत अफगाणिस्तान-इराक युद्धे सुरू झाली - त्यांचा शेवट दृष्टिक्षेपात नाही. गेल्या वर्षभरात गृहकर्जाचा आर्थिक गोंधळ, पेट्रोलच्या वाढत्या किंमती व अन्नधान्याचे जगभर कडाडणारे भाव यामुळे अमेरिकेला व इतर जगाला आर्थिक मंदी भेडसावत आहे. फक्त 'पोपट मेला आहे' असे कोणी स्पष्टपणे म्हणून इच्छित नाही.

अशा परिस्थितीत रिपब्लिकन पक्षालाच परत निवडून द्यायचे की डेमोक्रॅटिक पक्षाला हा निर्णय अमेरिकन मतदारांना नोव्हेंबरच्या निवडणुकांत घ्यावा लागणार आहे. रिपब्लिकन पक्षातर्फे जॉन मॅकेन यांची उमेदवारी निश्चित आहे. या गृहस्थांची आंतरराष्ट्रीय राजकारणाची जाण संशयास्पद आहे. मध्यपूर्वेच्या अलिकडच्या दौऱ्यात त्यांना शिया कोण आणि सुन्नी कोण, अल्-कईदा नक्की कोणत्या देशात प्रबळ आहे, हेही नीट माहिती नसल्याचे वारंवार उघड झाले. त्यांच्या अखत्यारीत इराक युद्ध लवकर संपेल अशीही आशा नाही. थोडक्यात, अमेरिकेची आजवरची अहंकारी वर्तणूक ते अध्यक्ष झाल्यास कायम राहील. मात्र, हा अहंकार ज्या आर्थिक-लष्करी ताकदीवर आधारित आहे, ती ताकद कमी होत चालल्याने महासत्ता म्हणून अमेरिकेचा अस्तही लवकर होण्यास मदत होईल. पण रिपब्लिकन-डेमोक्रॅटिक या प्रमुख द्वंद्वापेक्षा डेमोक्रॅटिक पक्षांतर्गत ओबामा-क्लिंटन हे उपद्वंद्वच जास्त प्रकाशात राहिले आहे. जानेवारीपासून या दोघांतील पक्षाचा उमेदवार ठरवण्यासाठी अमेरिकेतील पन्नास राज्यात निवडणुका सुरू झाल्या. हिलरी क्लिंटन या माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या पत्नी. ते २००१ पर्यंत आठ वर्षे अध्यक्ष आणि त्याआधी सुमारे १२ वर्षे अर्कान्सास या राज्याचे गव्हर्नर होते. या दरम्यान हिलरी क्लिंटन या ना त्या समितीवर अनिर्वाचित नेमणुकांद्वारे सत्ताकारणात सक्रिय होत्या. म्हणजे, प्रत्यक्ष राजकारणात उतरण्याआधी सोनिया गांधी जशा इंदिरा गांधींची सून, राजीव गांधींची पत्नी म्हणून सत्ताकेंद्राच्या अगदी जवळ होत्या, तशाच हिलरी क्लिंटनही अनेक वर्षे सत्तापीठाचा भाग होत्या. २००१ पासून त्या खासदार आहेत. मागच्या वर्षी अध्यक्ष होण्याचा मनोदय त्यांनी जाहीर केला, तेव्हा 'हिलरी क्लिंटनना पर्याय नाही' अशी त्यांच्या पक्षाची खात्री होती.

मात्र जानेवारीत उमेदवार ठरवण्यासाठी निवडणुका सुरू झाल्यावर हां हां म्हणता चित्र पालटले. बराक हुसेन ओबामा हा तोपर्यंत कोणीच महत्त्वाचा न मानलेला उमेदवार झपाट्याने पुढे आला. गेल्या चार-पाच महिन्यांतील राज्यवार निवडणुकांत दोघांमध्ये कमालीची चुरस निर्माण झाली. अमाप पैसा, राजकीय संपर्काचे २५ वर्षांचे घट्ट जाळे, बलिष्ठ आश्रित, बिल क्लिंटन प्रमुख प्रचारक अशा अत्यंत अनुकूल स्थितीत प्रचारमोहिमेला सुरूवात करूनही क्लिंटन या स्पर्धेत जेमतेम टिकून आहेत.

बराक ओबामा मिश्रवंशीय. त्यांचे वडील कृष्णवर्णीय आफ्रिकन आणि आई गौरवर्णीय अमेरिकन. बालपणाची काही वर्षे इंडोनेशिया या मुस्लिम बहुसंख्य देशात गेलेली. या गोष्टी महत्त्वाच्या, कारण आपल्याकडच्या जातिव्यवस्थेसारखा अमेरिकेच्या मानसिकतेत वर्णद्वेष भिनलेला आहे आणि एकूणच पश्चिमेत व विशेषत: अमेरिकेत वातावरण कमालीचे मुस्लिमविरोधी आहे. अशा परिस्थितीत अर्धकृष्णवर्णीय आणि नावात 'हुसेन' असणारा माणूस या स्पर्धेत इथपर्यंत पोचला ही अवाक् करणारी घटना आहे.

वर्णद्वेषापेक्षा स्त्रीद्वेष प्रखर असतो असा निष्कर्ष आता समाज'तज्ज्ञ' काढत आहेत. अर्थात चित्र उलटे असते तर त्याच तत्परतेने आणि शब्दकौशल्याने याच तज्ज्ञांनी उलटा निष्कर्ष काढला असता. पण अमेरिकेतील वर्णद्वेष किंवा स्त्रीद्वेष हा मुद्दा तिसऱ्या जगाच्या दृष्टीने महत्त्वाचा नाही. एकतर युरोपआधी आशियामध्ये देशाच्या नेतृत्वपदी 'स्त्रिया' मागच्या पिढीपासून आलेल्या आहेत. त्यांच्यामुळे त्या-त्या देशातील स्त्रियांची परिस्थिती सुधारली असेही नाही किंवा देशांची धोरणे विशेष जनहितकारक झाली असेही नाही.

त्यामुळे हे उपद्वंद्व निराळ्या दृष्टीने पहावे लागेल. एकीकडे प्रस्थापित व्यवस्थेने दिलेले फायदे आयुष्यभर मिळवायचे आणि मग सत्तेसाठी एके दिवशी हीच व्यवस्था बदलणारा मी क्रांतीदूत आहे असे जाहीर करायचे - या भूमिकेला विश्वासार्हता नाही. क्लिंटनची भूमिका अशी आहे. व्यवस्थेच्या हितसंबंधीयांशी त्यांची जवळीक जुनी आणि खोल आहे. ओबामा हा या प्रस्थापिताच्या 'बाहेरून' आलेला उमेदवार आहे. उदाहरणार्थ, इराक युद्धाला जेव्हा अमेरिकन जनमत अनुकूल होते, तेव्हा क्लिंटनने त्याला पाठिंबा दिला होता. ओबामाने विरोध केला होता. आता जनमत विरुद्ध गेल्याने क्लिंटन अडचणीत आल्या आहेत. अर्थात केवळ 'बाहेरचा' उमेदवार म्हणून ओबामा यशस्वी झाल्यास उर्वरित जगाविषयीचे अमेरिकेचे धोरण आमूलाग्र बदलेल असे नाही. सत्तेचे स्वत:चे एक तर्कशास्त्र असते. राष्ट्राध्यक्ष हे अनेक हितसंबंधांचे सांकेतिक शिखर असते. यातील अनेक हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी आज रिपब्लिकन पक्षाला मदत करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या उद्या ओबामाच्या डेमोक्रॅटिक पक्षालाही मदत करतील. त्यामुळे ओबामांच्या उमेदवार ते राष्ट्राध्यक्ष या प्रवासात उर्वरित जगाचा भ्रमनिरास होण्याची शक्यताच जास्त आहे.

तरीही, केवळ मतदानाने प्रस्थापिताला नमवण्याची ताकद या सहा महिन्यांत दिसून आली आहे, हे नक्की.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***

*Email - artnondeco@yahoo.co.uk*

*Website - www.art-non-deco.com*

❐